# सभेचा कार्यवृत्तांत

सोलापूर विद्यापीठाच्या **व्यवस्थापन परिषदेची सभा बुधवार दि.२२/०८/०७ रोजी दुपारी १-०० वा.** व्यवस्थापन परिषद सभागृहात झाली. या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. डॉ. इरेश स्वामी - कुलगुरु. | अध्यक्ष |
| २) | मा.श्रीमती डॉ. व्ही. जे. नाईकनवरे. | सदस्या |
| ३) | मा. ॲड. रामदास पी. सब्बन | सदस्य |
| ४) | डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ५) | डॉ. आर. आर. पाटील, संचालक म. व. वि. वि. मं. - पदसिध्द | सदस्य |
| ६) | प्राचार्य जे. के. बिले | सदस्य |
| ७) | डॉ. सी. बी. कोळेकर | सदस्य |
| ८) | डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| ९) | श्री. एन. बी. पवार | सदस्य |
| १०) | श्रीमती एन. व्ही. साठे | सदस्या |
| ११) | श्री. पी. एम. हिरेमठ | सदस्य |
| १२) | श्री. व्ही. तिरुपती | सदस्य |
| १३) | प्रा. बी. पी. रोंगे | सदस्य |
| १४) | डॉ. डी. डी. रणनवरे | सदस्य |
| १५) | श्रीमती मिनाक्षी सुभाष कदम | सदस्या |
| १६) | डॉ. एम. एस. शेजूळ - परीक्षा नियंत्रक | स्थायी निमंत्रित |
| १७) | श्री. एम. के. कौरथी - वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित |
| १८) | डॉ. एम. एस. शेजूळ - प्र. कुलसचिव | सचिव |

सभा दुपारी १ वा. आयोजित केलेली होती. यावेळी फक्त ६ सदस्य (मा.अध्यक्ष, डॉ. आर. आर. पाटील, श्री. एम. के. कौरथी, डॉ. पी. जी. मोरे, श्रीमती मिनाक्षी कदम आणि डॉ. एम.एस.शेजूळ) उपस्थित होते. मा. अध्यक्ष यांनी गणपूर्तीअभावी सभा अर्धा तास तहकूब केली नंतर १ वाजून ४४ मिनिटांनी सभा सुरु झाली.

सभेच्या सुरुवातीस मा. प्र.कुलसचिव यांनी मा.कुलगुरु यांच्यावतीने व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे स्वागत केले. मा. जयसिंह मोहिते-पाटील हे या सभेस उपस्थित राहू शकणार नसल्याचे त्यांनी दूरध्वनीवरुन मा.प्र.कुलसचिव यांना कळविले. त्यानुसार याची व्यवस्थापन परिषद सदस्यांनी नोंद घेतली.

सभा सुरु झाल्यानंतर सर्व व्यवस्थापन परिषद सदस्यांनी दि. १ ऑगस्ट २००७ पासून आजतागायत विद्यापीठामधील झालेल्या घडामोडीची माहिती मागितली नंतर कार्यक्रमपत्रिकेवरील विषयास सुरुवात करावी असा आग्रह धरला.

डॉ. पी. बी. कुंभार यांनी म.वि.का. १९९४ मधील ४९ (६) नुसार व्यवस्थापन परिषदेपुढे सादर केलेले अपील कार्यालयास दि.१८/८/०७ रोजी सायंकाळी ६-१५ वा. मिळाले आणि दि.१९ रोजी रविवार आणि दि.२० रोजी पतेतीनिमित्त कार्यालयास सुट्टी असल्याने यावर कार्यवाही करण्याकरिता ते अपील मा.प्र.कुलसचिव यांच्याकडे दि.२१/८/०७ रोजी दिल्याचे मा.कुलगुरु यांनी सांगितले. वेळेअभावी या अपीलावर कार्यालयीन टिप्पणी तयार करता आली नाही. म्हणून पुढील सभेत या अपीलावर कार्यालयीन टिप्पणीसह विचारार्थ ठेवण्यात येणार असल्याचे मा.कुलगुरु यांनी सांगितले. इतके सांगूनही व्यवस्थापन

**[कृ.मा.प.]**

परिषद सदस्य ऐकत नसल्याचे मा.कुलगुरु यांच्या लक्षात येताच त्यांनी सदरची सभा संपल्याचे जाहीर करेन आणि सभेस मा.अध्यक्षांना उपमर्दकारक वक्तव्य करणाऱ्या त्या सदस्यांची नांवे महामहिम कुलपती यांच्याकडे पाठविणार असल्याचे सांगितले.

मा.कुलगुरु यांनी कार्यक्रमपत्रिकेप्रमाणे विषय आधी घेतले जातील असे सदस्यांना सांगितले. परंतु सदस्यांनी प्रथमत: आमच्या मागणीनुसार चर्चा व्हावी असा आग्रह धरला. मा. सदस्यांची विनंती मान्य करुन मा.कुलगुरु यांनी डॉ. पी. बी. कुंभार यांचे निलंबन का केले? हे सांगितले. तथापि सन्माननीय सदस्यांनी त्यांचा आग्रह कायम ठेवल्याने मा.कुलगुरु यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**सही/-**
**डॉ. आय. एस. स्वामी**
**अध्यक्ष.**

**[कृ.मा.प.]**